Roll No.: | | | | | | |

GSCN/S-2019/SEM-I/BCL 1.M

Shiksha Mandal, Wardha's

# G. S. College of Commerce & Economics, Nagpur

An Autonomous Institution

(Affiliated to Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University)

First Semester Bachelor of Commerce Examination (CBCS)

## MARATHI

(BCL 1.M)

Time: 3 Hours Maximum Marks: 80

प्र.१ खालील प्रश्नाचे उत्तर १५० ते २०० शब्दांत लिहा. ०८

अ. 'राजकीय लोकशाही टिकविण्यासाठी सामाजिक लोकशाहीची आवश्यकता आहे'असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर का म्हणतात? ते लिहा.

किंवा

'शाहू महाराज दलितांचे खरेखुरे कैवारी होते' हे विधान स्पष्ट करा.

ब. शिक्षणाच्या बेगडी संस्कारांनी प्रकाश आपल्याच आप्तबांधवांपासून कसा दूर जातो याचे भेदक चित्रण 'बेगड' या कथेच्या आधारे लिहा. ०८

किंवा

'उमा' या कथेच्या आधारे उमाचे व्यक्तिचित्र रेखाटा.

प्र.२ खालील चार पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ७५ ते १०० शब्दांत लिहा. ०८

अ. १. जाती देशविघातक, बंधुत्वाला मारक आहे असे डॉ. आंबेडकर का म्हणतात?

२. 'देबू' चे व्यक्तिचित्रण रेखाटा.

३. सोनतळी कॅम्पवरील प्रसंगाचे वर्णन करा.

४. विठोबा प्रकाशची आतुरतेने वाट कां पाहतो?

ब. खालील चार पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन ओळीत लिहा. ०४

१. सर्वनाश, सर्वनाश, सर्वनाश होऊ दे सगळ्यांचा! माझ्याच एकट्याचा का? हे वाक्य कोणी म्हटले? का?

२. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण खात्याला कोणत्या सूचना दिल्या?

३. अंजनाने प्रकाशचे स्वागत कसे केले?

४. कोणती ध्वनिमुद्रिका पुन्हा पुन्हा ऐकण्याचा नाद लेखकाला लागला?

क. खालील सहा पैकी कोणत्याही चार म्हणी पूर्ण करा. ०४

१. अति तेथे ...........

२. आलिया भोगासी.............

३. कठीण समय येता,............

४. गरज सरो...........

५. नकटीच्या लग्नाला...............

६. लाथ मारीन,...........

प्र.३ खालील प्रश्नाचे उत्तर १५० ते २०० शब्दांत लिहा. ०८

अ. बा.सी मर्ढेकरांच्या ‘गणपत वाणी’ या कवितेचा भावार्थ लिहा.

किंवा

बहिणाबाई चौधरी यांच्या ‘मन’ या कवितेचे रसग्रहण करा.

ब. खालील चार पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ७५ ते १०० शब्दांत लिहा. ०८

१. ‘पैल तो गे काऊ कोकताहे’ या अभंगाचे रसग्रहण करा.

२. ‘गणपत वाणी’ या कवितेच्या आधारे गणपत वाण्याचे व्यक्तिचित्रण रेखाटा.

३. ‘निर्मून धन आम्ही सारं। मालक असून झालो चोर’, या ओळींचा अर्थ स्पष्ट करा.

४. ‘मरणाचा दाटे कंठ’, आयुष्यच झाले प्रेत’ या कवितेच्या ओळीतून कवीला काय सांगायचे आहे?

प्र.४ खालील प्रश्नाचे उत्तर १५० ते २०० शब्दांत लिहा. ०८

अ. राहणीमान आणि खानेपिणे यावरील खर्च कमी करण्यात गांधीजी कसे यशस्वी झाले?

किंवा

‘असत्यरूपी हलाहल’ या प्रकरणावर टीपण लिहा.

ब. खालील चार पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ७५ ते १०० शब्दांत लिहा. ०८

१. मांसाहार केल्यानंतर गॉंधीजींच्या झालेल्या अवस्थेचे वर्णन करा.

२. हायस्कुलात पहिल्याच वर्षी परीक्षेच्या प्रसंगी घडलेल्या प्रसंगाचे वर्णन करा.

३. ख्रिस्ती धर्माबद्दल गॉंधीजीच्या मनात अनादर का निर्माण झाला?

४. कोणत्या घटनेनंतर चोरी करायची नाही असे गांधींजींनी ठरवले?

प्र.५ खालील दोन पैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा. ०८

अ. नवीन बस-मार्ग सुरू करण्याविषयी नागपूर महानगरपालिका परिवहन मंडळाला पत्र लिहा.

किंवा

आदर्श महाविद्यालयात वरिष्ठ लिपिकाच्या जागेसाठी अर्ज करा.

ब. खालील चार पैकी कोणत्याही एका विषयावर २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा. ०८

१. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची कारणे आणि उपाय

२. विद्यार्थ्यांमधील वाढती व्यसनाधिनता

३. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार

४. स्त्री भ्रूणहत्या गंभीर समस्या

***